बिगर सिंचन पाणी आरक्षणामुळे कमी होणाऱ्या सिंचनक्षमतेसाठी सिंचन पुनर्स्थापना खर्चाबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन परिपत्रक क्रमांक :- बिसिंआ-२०१९/प्र.क्र.१५०/ सिं.व्य.(धो)
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : - २९/५/२०१९

<u>संदर्भ</u> :-

१) महाराष्ट्र शासन पाटबंधारे विभाग, शासन परिपत्रक क्र. बिपापु-१००१/ (७१३/२००१)/ सिं.व्य (धो) दि. ७/४/२००३.
२) शासन निर्णय क्रमांक. बिपापु-१००३/(४२१/२००३)/सिं.व्य.(धो), दि. २१/२/२००४.
३) शासन परिपत्रक बिपापु -१००३/(४२१/२००३)/सिं.व्य.(धो), दि. २१/२/२००४.
४) शासन परिपत्रक क्रमांक. संकीर्ण २००८/(१३१/०८)/सिं.व्य.(धो), दि. ६/३/२००९.
५) शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१३/४१५/२०१३/सिं.व्य (धोरण), मंत्रालय मुंबई ४०० ०३२ दि. १६/८/२०१४.
६) शासन निर्णय क्र. देवदु-२०१५/(८३६/२०१५)/सिं.व्य.(कामे), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दि. १७/११/२०१६.
७) शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/(४४/१५)/ सिं.व्य (धोरण), मंत्रालय मुंबई ४०० ०३२ दि. १७/११/२०१६.
८) नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र. २७४/नवि-३३, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ दि. १७/१२/२०१६
९) शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१८/(५११/२०१८)/सिं.व्य (धो) दि. १/१२/२०१८.

<u>प्रस्तावना</u> :-

महाराष्ट्र जलसंपत्ती अधिनियम २००५ मधील कलम १६ (क) नुसार संदर्भ क्र. ७ च्या शासन निर्णयान्वये विविध प्रवर्गाकरीता (पिण्यासाठी, औद्योगिक सिंचन) पाण्याचे क्षेत्रीय वाटप निर्धारित करण्यात आले असून प्रकरण परत्वे बिगर सिंचन पाणी आरक्षण प्रस्तावांना मंजूरी देण्यासाठी स्तर निश्चित करण्यात आले आहेत. उपरोक्त विविध संदर्भीय शासन निर्णय/परिपत्रकान्वये बिगर सिंचन पाणी वापराचे करारनामे, भांडवली खर्च अंशदान व सिंचन पुन:स्थापनेचा खर्च याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले होते.

बिगर सिंचन पाणी आरक्षणामुळे कमी होणाऱ्या सिंचन क्षमतेसाठी संदर्भ क्र. ३ च्या शासन परिपत्रकान्वये सिंचनाच्या पुनर्स्थापनेचा खर्च रु. ५०,०००/- प्रति हेक्टर परिगणित करण्यात येत होता. तद्नंतर वाढलेल्या महागाई निर्देशांकांचा विचार करता संदर्भ क्र. ४ च्या शासन परिपत्रकान्वये सिंचन पुनर्स्थापनेचा खर्च रु. १,००,०००/- प्रति हेक्टर इतका आकारण्यात यावा असे निर्देश देण्यात आले.

त्यानंतर संदर्भ क्र. ५ च्या शासन निर्णयानुसार पुनर्स्थापनेचा खर्च रु १ लक्ष प्रति हेक्टर (Base year २००९) वर भाववाढ निर्देशांक (cost inglation index) विचारात घेऊन येणारी रक्कम अथवा प्रत्यक्ष करारनामा करतेवेळी लागू असलेला शासनाचा प्रचलित दर या दोघांपैकी जो जास्त असेल त्या दराने सिंचन पुन:र्स्थापनेचा खर्च आकारण्यात यावा असे निर्देश दिले.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-१३ या वर्षाच्या पाटबंधारे प्रकल्प व्यवस्थापन अहवालातील परिच्छेदा संदर्भात लोकलेखा समितीने फक्त नवीन आरक्षणासाठी पुनर्स्थापना खर्च घ्यावा किंवा जेव्हा जेव्हा आरक्षण नूतनीकरण करण्यात येईल तेव्हा सिंचन क्षेत्र

कपातीसाठी पुनर्स्थापना खर्च आकारण्यात येईल किंवा कसे याबाबत स्पष्टता आणण्याच्या दृष्टीने सुधारणा करण्याचे निर्देश दिले आहेत.

सन २००४ पूर्वी मंजूरी देताना पुर्नस्थापना खर्च आकारण्याची तरतूद नव्हती. त्यामुळे नुतनीकरण करतांना नवीन अटी टाकणे संयुक्तीक होत नाही. मूलभूत शर्तीत भविष्यात बदल करणे उचित होत नाही.

त्यानुसार सिंचन पुनर्स्थापना खर्चाबाबत स्पष्टता आणण्याच्या दृष्टीने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

शासन निर्णय:-

बिगर सिंचन पाणी आरक्षणामुळे कमी होणाऱ्या सिंचनक्षमतेसाठी सिंचन पुनर्स्थापना खर्चाची आकारणी करण्याबाबतचे परिपत्रक दि. २१/२/२००४ रोजी निर्गमित करण्यात आले आहे. त्यापूर्वी देण्यात आलेल्या बिगर सिंचन पाणी आरक्षण मंजूऱ्यामध्ये सिंचन पुनर्स्थापना खर्च वसूल करण्याची तरतूद नव्हती. त्यामुळे खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१) बिगर सिंचन पाणी आरक्षणाची मूळ मंजूरी दि.२१/२/२००४ पूर्वीची असल्यास करारनामा नूतनीकरण करताना /मुदतवाढ देताना सिंचन पुनर्स्थापना खर्च वसूल करण्यात येऊ नये.

२) बिगर सिंचन पाणी आरक्षणाची मूळ मंजूरी ही दि.२१/२/२००४ नंतर देण्यात आली असल्यास, सिंचन पुनर्स्थापना खर्च हा मूळ करारनामा करतेवेळी अस्तित्वात असलेल्या शासन परिपत्रकातील निर्देशांन्वये वसूल करावा व सदर करारनाम्यांचे नूतनीकरण करताना पूर्वलक्षी प्रभावाने सिंचन पुनर्स्थापना खर्चामध्ये वाढ करण्यात येऊ नये.

३) सिंचन पुनर्स्थापना खर्च एकदा घेतल्यानंतर नुतनीकरण करतांना पुनश्च घेण्यात येऊ नये.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१९०५२९१६०५४३८८२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Atul Ashok Kapole

Digitally signed by Atul Ashok Kapole
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=797fcfe0bb4a86dd814129f50d05c1d249ea6f0acc364c6214f11ff7174bd5ef, serialNumber=ae2c4f4c985d3e984de94324901263d48766ec651dea49d652faf11a96aa98b5, cn=Atul Ashok Kapole
Date: 2019.05.29 16:09:16 +05'30'

(अ.अ.कपोले)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. सर्व मंत्रालयीन विभाग
५. अप्पर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव, नगर विकास विभाग १ व २, , मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९. सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई

१०. महासंचालक, माहिती व प्रसिध्दी संचालनालय, मुंबई
११. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी, मुंबई
१३. महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य १, मुंबई
१४. महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य २, नागपूर
१५. प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य १, मुंबई
१६. विभागीय आयुक्त, मुंबई/नाशिक/पुणे/औरंगाबाद/नागपूर व अमरावती
१७. आयुक्त, कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१८. सचिव, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई
१९. सर्व कार्यकारी संचालक, पाटबंधारे विकास महामंडळे/महासंचालक (वाल्मी/मेरी)
२०. सर्व मुख्य अभियंते, जलसंपदा विभाग/पाटबंधारे विकास महामंडळे
२१. सर्व आयुक्त, महानगरपालिका
२२. सर्व जिल्हाधिकारी,
२३. सर्व जिल्हा परिषंदाचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२४. सर्व अधीक्षक अभियंते, जलसंपदा विभाग
२५. सर्व अधीक्षक अभियंते व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण
२६. सर्व कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग
२७. सर्व तांत्रिक अधिकारी/कार्यासने, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
२८. सिं.व्य.(धो)संग्रहार्थ.